महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ २८ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २४३ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

थोडक्यात महत्वाचे

## ‘हिंद-दी-चादर’ समागमाला पंतप्रधानांची ऑनलाईन उपस्थिती

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २७**

**नवी मुंबई :** श्री गुरू तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमाच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईतील खारघर येथे ‘हिंद-दी-चादर’ हा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास नरेंद्र मोदी हे दूरदृश्य प्रणालीद्वारे (ऑनलाइन) उपस्थित राहणार असून अमित शहा यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीबाबत मात्र साशंकता व्यक्त करण्यात येत आहे. २ दिवसांचा भव्य समागम खारघर येथील ओवे मैदानात दि. २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी हा दोन दिवसीय समागम पार पडणार आहे. या कार्यक्रमासाठी देश-विदेशातून सुमारे १८ ते २० लाख भाविक उपस्थित राहण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. प्रारंभी पंतप्रधान व केंद्रीय गृहमंत्री यांच्या उपस्थितीचे नियोजन करण्यात आले होते, त्यानुसार प्रशासनाने तयारीही सुरू केली होती. प्रशासन सज्ज; वाहतूक बदल लागू कार्यक्रमाच्या प्रसिद्धीसाठी मुंबई महानगरात बॅनरबाजी व डिजिटल जाहिराती करण्यात आल्या असून जिल्हा प्रशासनाकडून जोरदार तयारी सुरू आहे. भव्य मंडप, वाहनतळ, बसगाड्यांची व्यवस्था, हेलीपॅड, भाविकांसाठी निवास व्यवस्था, तात्पुरती स्वच्छतागृहे तसेच आरोग्य पथके तैनात केली जाणार आहेत. या पार्श्वभूमीवर ठाणे व नवी मुंबई शहरात वाहतूक बदल लागू करण्यात आले असून अवजड वाहनांच्या वाहतुकीवर पूर्णतः बंदी घालण्यात आली आहे.

# अजित पवार धुक्याने गेले की धोक्याने?

## राज ठाकरेंचा सवाल ! ■ रोहित पवार राज दरबारी

राज साहेब हे राज्यातील एक लोकप्रिय नेते असून त्यांना मानणारा राज्यात एक मोठा वर्ग आहे. आज त्यांची भेट घेऊन अजितदादांच्या संशयास्पद अपघाती मृत्यूप्रकरणी त्यांना पुराव्यांसह सविस्तर माहिती दिली आणि त्यांच्याही मनात असलेल्या काही प्रश्नांविषयी चर्चा केली. यावेळी माझे मित्र अमित जी ठाकरे हेही उपस्थित होते. मला विश्वास आहे की, अजितदादांना न्याय मिळवून देण्याच्या या लढ्यात राज ठाकरे साहेब हे पूर्ण ताकदीनिशी आमच्या पाठीशी उभं राहतील ● रोहित पवार

रोहित पवारांनी उपस्थित केलेल्या शंकांवर प्रतिक्रिया देताना देवेंद्र फडणवीस यांनी आपली भूमिका अधिक स्पष्ट केली. रोहित पवार यांनी आज माझी भेट घेऊन काही मुद्दे मांडले असून, त्यांनी दिलेल्या पत्रासोबत मीही माझे पत्र जोडून या घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी डीजीसीएकडे करणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.अशा दुर्दैवी घटनांबाबत कुठलीही पतंगबाजी किंवा हवेत गोळीबार करणे योग्य नाही. हा अत्यंत संवेदनशील विषय असून, निधन झालेल्या व्यक्तीची पद-प्रतिष्ठा तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या सन्मानाचाही विचार झाला पाहिजे. त्यामुळे जबाबदारीने आणि संवेदनशीलतेनेच या प्रकरणाकडे पाहिले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. याप्रश्नी यापुढे अधिक भाष्य करणे योग्य ठरणार नाही, अशी भूमिका मुख्यमंत्री फडणवीस यांनी मांडली.



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**मुंबई ● प्रतिनिधी - दि.27**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आज अजितदादांच्या मृत्यूची चौकशी करण्यासाठी व्यापक बळ मिळावे, यासाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी तपशील सादर केल्यानंतर राज यांनीही एफआयआरवरून सरकारला धारेवर धरले. हा विषय कोणत्याही राजकारणाच्या पलीकडचा असून महाराष्ट्रासाठी अत्यंत दुर्दैवी आहे. रोहित पवारांनी हा प्रश्न सुरू असलेल्या विधानसभा अधिवेशनात मांडावा आणि राष्ट्रवादीच्या खासदारांनी हा मुद्दा लोकसभेत उपस्थित करावा, असं मी त्यांना सांगितलं असल्याचे ते म्हणाले.

**■ तिन्ही ठिकाणी सरकारने एफआयआर घेऊ दिला नाही**

राज ठाकरे यांनी सांगितलं की, रोहित पवार यांच्या बोलण्यातून मला एकच मुख्य गोष्ट जाणवली ती म्हणजे त्यांनी तीन ठिकाणी एफआयआर (FIR) नोंदवण्याचा प्रयत्न केला, पण तिन्ही ठिकाणी सरकारने तो घेऊ दिला नाही. मरीन ड्राईव्ह पोलीस स्टेशनमध्ये जेव्हा अधिकारी एफआयआर टाईप करत होते, तेव्हा तिथल्या डीसीपींनी येऊन तो लिहून न घेण्याच्या सूचना दिल्या. सरकार किंवा पोलीस स्टेशनला हा एफआयआर का नको आहे? अजित पवारांसारख्या मोठ्या नेत्याच्या मृत्यू प्रकरणात जर एफआयआर नोंदवला जात नसेल, तर सर्वसामान्य माणसाचे काय होणार? अशी विचारणा राज यांनी केली.

**■ सरकारकडून अडथळे का आणले जात आहेत?**

राज ठाकरे म्हणाले की, जर हा केवळ अपघात असेल आणि घातपात नसेल, तर तक्रार नोंदवण्याला सरकारकडून अडथळे का आणले जात आहेत? यामुळेच ‘काहीतरी काळभेर आहे’ असा संशय निर्माण होतो. सरकार या संपूर्ण प्रकरणामागे ‘संशयाची भूतं’ नाचवतंय असं मला वाटतंय. एफआयआर नोंदवल्यानंतर ज्या गोष्टी सांगितल्या जातील, त्याप्रमाणे चौकशी व्हावी, हे अत्यंत सोपे आहे, पण सरकार पोलीस यंत्रणेवर दबाव टाकत असल्याचा आरोप राज यांनी केला.

**■ सुनेत्रा वहिनींनी या विषयावर बोललं पाहिजे**

राज यांनी सांगितले की, सुनेत्रा वहिनी सध्या तिथे उपमुख्यमंत्री म्हणून बसल्या आहेत, त्यांनी या गोष्टीचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. अजित पवार त्यांचे पती होते आणि त्यांच्याच पतीच्या अपघाताबद्दल हा एफआयआर आहे, त्यामुळे सुनेत्रा वहिनींनी या विषयावर बोललं पाहिजे, अशी भावना राज यांनी व्यक्त केली.

**■ ‘ब्लॅक बॉक्स’ नष्ट होत नाही**

मनसे अध्यक्षांनी सांगितले की, विमान कितीही उद्ध्वस्त झाले तरी ‘ब्लॅक बॉक्स’ कधीच नष्ट होत नाही, परंतु त्याचे काय झाले हे अजूनही महाराष्ट्राला समजत नाही. सीआयडी आणि सीबीआय चौकशी नक्की कुठपर्यंत आली आहे आणि डीजीसीएचा अहवाल अद्याप का आला नाही, हे प्रश्न अनुत्तरित आहेत. एका महिन्याच्या आत प्राथमिक अहवाल देण्याचे आश्वासन दिले होते, मात्र तो अद्याप सादर झालेला नाही, ज्यामुळे लोकांच्या मनात शंका निर्माण होत आहेत, असे राज यांनी सांगितलं.




## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विधान भवनात विशेष कार्यक्रम

### अभिजात मराठी साहित्य, विनोद व संतपरंपरेचा गौरव

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २७**

**मुंबई :** मुंबई येथील विधान भवनात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ‘जावे विनोदाच्या गावा... उलगडूया अभिजात मराठी साहित्यातील विनोदाचे दालन’ हा विशेष कार्यक्रम देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी विधानपरिषद सभापती राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह अनेक मंत्री, कलाकार व मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा देत कविवर्य कुसुमाग्रज यांना अभिवादन केले. मराठी भाषेची अभिजात परंपरा, संत साहित्याची समृद्धी आणि विनोदाच्या माध्यमातून व्यक्त होणारी मराठी अस्मिता यांचा त्यांनी गौरव केला. कविता, अभिवाचन, गीत व विनोदातून मराठी भाषेचे विविध पैलू उलगडणारा हा कार्यक्रम अत्यंत प्रभावी ठरल्याचे त्यांनी नमूद केले.

**■ मराठीच्या संवर्धनाची सामूहिक जबाबदारी**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर तिचे जतन, संवर्धन व प्रसार ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मराठीतील लोककला, लोकसाहित्य, बोलीभाषा व विनोद यांचे वैविध्य जपत ते नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. मराठी ही ज्ञानभाषा म्हणून अधिक बळकट व्हावी आणि तिचा गौरव अखंड सुरू राहावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.



# श्रीरामकृष्ण सेवा ट्रस्टतर्फे गरजूना अन्न धान्य वाटप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याणच्या श्रीरामकृष्ण सेवाट्रस्ट तर्फे दर महिन्याला गरीब गरजू लोकांना अन्नधान्य वाटप करण्यात येते. कल्याण पश्चिम शहरात गेली ३५ वर्ष हा उपक्रम चालू असून अनेक गोरगरीब गरजूं या योजनेचा लाभ घेत असतात. महिन्यातून एकदा हे धान्य वाटप केलं जातं त्याचबरोबर रोज दुपारी भुकेल्या लोकांना जेवण दिले जाते. आधारवाडी येथे अन्नक्षेत्र असून येथे हे उपक्रम राबविले जातात.

गुरूवारी झालेल्या या उपक्राला विषेश अतिथी म्हणून कल्याण डोंबिवली महापालिकेच्या नगर सेवीका हेमलता पवार उपस्थित होत्या. याप्रसंगी संस्थेचे संचालक जसू चंदाराणा व छबिल कारीया यांनी संस्थे तर्फे त्यांचा सत्कार केला. उपस्थित दाता नितेश कारीया, डॉक्टर अवधूत शेट्ये, मोनीस चंदाराणा, राजू विठलानी, विष्णूकुमार चौधरी, राजीव चंदाराणा, तुषार दाणी, नटु खिमानी, रवि चौधरी आदी मान्यवरांच्या हस्ते अन्नधान्य वितरण करण्यात आले.



# भिवंडी महानगरपालिकेच्या सेवानिवृत्त कर्मचा-यांना निरोप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी /दि. 27 : प्रतिनिधी**

महानगरपालिका सेवेतून नियत वयोमानानुसार 8 कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने महानगरपालिकेचे मा. आयुक्त श्री. अनमोल सागर, यांनी दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेतर्फे सेवानिवृत्त कर्मचा-यांना कार्यक्रमाच्या माध्यमातून निरोप देणेत आला. याप्रसंगी महानगरपालिकेचे मा. उप-आयुक्त(मुख्यालय) श्री. विक्रम दराडे यांच्या हस्ते सदर सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधीचे धनादेश पत्र, शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला आणि त्यांना त्यांच्या पुढील आयुष्याकरीता शुभेच्छा दिल्या.

महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमातीच्या तिसरा मजल्यावरील मा. आयुक्त यांचे सभागृह येथे संपन्न झालेल्या या निरोप समारंभाच्या कार्यक्रमात १) श्री. राजेश पंढरीनाथ पवार (सब स्टेशन ऑफिसर) अग्निशमन विभाग – सेवानिवृत्त, २) श्री. अनिल शंकर कोकाटे (फायरमन) अग्निशमन विभाग सेवानिवृत्त, ३) श्री. संतोष वसंत कोंडलेकर (लिपीक), उपायुक्त (मुख्यालय) सेवानिवृत्त, ४) श्री. पुरूषोत्तम गंगाराम यादव (सफाई कामगार) सार्व. आरोग्य विभाग सेवानिवृत्त, ५) श्री. बाबुराव पांडुरंग घाडगे, (सफाई कामगार) प्रभाग समिती क्र. १, स्वेच्छानिवृत्त, ६) श्रीम. लक्ष्मी अशोक गांगुल, (सफाई कामगार), प्र.स.क्र.३ स्वेच्छानिवृत्त, ७) श्रीम. कमल गणेश भोईर, (सफाई कामगार), प्र.स.क्र. १- स्वेच्छानिवृत्त, ८) श्रीम. सुशिकला मधुकर परटोळे, (सफाई कामगार), प्र.स.क्र.१ स्वेच्छानिवृत्त अशा 8 कर्मचा-यांना महानगरपालिकेच्यावतीने आज निरोप देण्यात आला. याप्रसंगी मा. सहा. आयुक्त (सामान्य प्रशासन) श्री. शैलेश दोंदे, समाज कल्याण विभाग प्रमुख श्री. मिलींद पळसुले, परवाना विभाग प्रमुख श्री. स्नेहल पुण्यार्थी व महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी, सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त कर्मचा-यांचे कुटुंबातील सदस्य, तसेच युनियन चे सदस्य इ. उपस्थित होते.

# ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत बोजेवारांनी उलगडले मराठी भाषेचे प्राचिनत्व



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (27) : अभिजात मराठी भाषेचा जवळपास 60 लाख वर्षापूर्वी पासून सुरू झालेला प्रवास ज्येष्ठ पत्रकार आणि साहित्यिक श्रीकांत बोजेवार यांनी माहितीपूर्ण संशोधनातून श्रोत्यांसमोर मांडला. मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने ठाणे महानगरपालिकेच्यावतीने 'अभिजात मराठी भाषेचे प्राचिनत्व' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त (1) संदीप माळवी यांनी ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक श्रीकांत बोजेवार यांचे स्वागत केले.**

मराठी भाषेच्या जन्मापासून ते आजवरची विविध स्थित्यंतरे सांगतानाच मुघल, ब्रिटीश आणि पोर्तुगीज यांच्या आक्रमण आणि राजवटीतून मराठी भाषा कशी वाचली एवढेच नव्हे तर या राजवटीतही ती कशी समृद्ध होत गेली ते श्रीकांत बोजेवार यांनी सोदाहरणासह स्पष्ट केले.

मराठी भाषेच्या जतन आणि संवर्धनासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी जे द्रष्टेपण दाखविले ते सांगताना तत्कालीन मुद्रण कारखाना पोर्तुगीजांकडून महाराजांनी 167 सुवर्ण मुद्रांना विकत घेतला. परंतु सततच्या लढाई मोहिमा आणि स्वराजाच्या अन्य कामगिरीमुळे महाराजांना त्या कारखान्याला कार्यान्वित करण्यास अपयश आले पण अखेर महाराजांनी तो कारखाना एका उद्योजकाला 177 सुवर्णमुद्रांना विकला ही रंजक माहितीसुद्धा त्यांनी या व्याख्यानातून श्रोत्यांसमोर मांडली. जेणेकरुन आज 250 वर्षांची मुद्रण यंत्रणा मराठी भाषेच्या जतन आणि संवर्धनासाठी मोलाची ठरल्याचे त्यांनी नमूद केले

**भाषा ही समाजाची सांस्कृतिक स्मृती**

लीळाचरित्रापासून सुरू झालेली ग्रंथसंपदा आजच्या वर्तमानकालीन लेखकांनीही समृद्धीच्या उंचीवर कशी नेऊन ठेवली आहे हे सांगून त्यांनी सर्व श्रोतृवृंदाला आवाहन केले की, पेशाची भाषा कोणतीही असो, पण प्रेमाची भाषा मराठीच असू द्या असेही त्यांनी नमूद केले. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण, विज्ञान, माध्यमे आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे मराठीने नवे आयाम गाठले असून, जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवरही भाषेची अभिव्यक्ती अधिक समृद्ध होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले."भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती समाजाची सांस्कृतिक स्मृती असते. तिचे जतन आणि संवर्धन ही प्रत्येकाची जबाबदारी आहे," असे आवाहन करत बोजेवार यांनी सर्वांनीच वाचनसंस्कृती जोपासावी, असे आवाहन केले.

# कुसुमाग्रजांना अभिवादन करून भिवंडी महानगरपालिकेत मराठी भाषा गौरव दिन संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मातृभाषेचा गौरव म्हणून वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दि.२७फेब्रुवारी हा जन्मदिन मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्याबाब शासनाकडून सुचित करण्यात आले होते. त्यानुसार आज दि. २७/२/२०२६ रोजी वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्म दिनानिमित्त महानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावर मा. महापौर श्री. नारायण रतन चौधरी यांच्या शुभहस्ते व मा. उप-महापौर श्री. मोमीन अब्दुल तारिक बारी यांच्या उपस्थितीत वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार



अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी, श्री. मा. उप-आयुक्त (मुख्यालय) श्री. विक्रम दराडे, मा. उप-आयुक्त श्रीमती सपना वसावा, मा. शहर अभियंता श्री. जमिल पटेल, मा. अति.शहर अभियंता श्री. सचिन नाईक, मा. लेखा व वित्त अधिकारी श्री. रामप्रसाद सोलुंके,सहा. आयुक्त (निवडणुक) श्री. नितीन पाटील, सहा. आयुक्त प्रभाग समिती क्र. ४ श्री. गिरीधर घोष्टेकर, करमुल्यांकन अधिकारी श्री. सुधीर गुरव, उद्यान अधिक्षक श्री. निलेश संखे, समाज कल्याण अधिकारी श्री.मिलींद पळसुल, वाहन विभाग प्रमुख प्रशांत संखे व अधिकारी / कर्मचारी, तसेच पत्रकार वर्ग उपस्थित होते. तसेच महानगरपालिकेचे वतीने शाळामध्ये, वाचनालय विभाग येथे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



# सौ. कमलताई किसन कथोरे महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रातील मोलाचे योगदान व मराठी ही ज्ञानभाषा व्हावी यासाठी केलेला प्रयत्नांमुळे कवी कुसुमाग्रजांचा जन्मदिन २७ फेब्रुवारी हा 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. या निमित्ताने दि. २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी सौ. कमलताई किसन कथोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय म्हसा येथे मराठी विभाग आयोजित ग्रंथदिंडी, बोलींचा जागर व काव्यवाचन स्पर्धा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळी ९:०० वाजता महाविद्यालय ते म्हसा बाजारपेठ पर्यंत ग्रंथ दिंडी काढण्यात आली. या दिंडीत महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग तसेच विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषेत मोठ्या उत्साहात माय मराठीच्या गौरवाच्या घोषणा देत सहभाग घेतला. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश माळी सर यांनी कवी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तसेच दिप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात केली. मराठी विभाग प्रमुख प्रा. तनुजा देसले मॅडम यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक सादर केले महाविद्यालयाचे प्राचार्य माळी सर तसेच विधी महाविद्यालय म्हसा चे प्रा. गणेश चहाड सर यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषा गौरव दिनानिमित्त सखोल मार्गदर्शन केले. सुनियोजित कार्यक्रमानुसार विद्यार्थ्यांनी ठाणे जिल्ह्यातील विविध बोली गीतांचे गायन केले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी काव्यवाचन स्पर्धेतही उत्स्फूर्त सहभाग घेतला त्यापैकी गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव हा प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन प्राचार्यांच्या शुभहस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. तनुजा देसले मॅडम यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर, संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे मॅम, संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे सर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. यावेळी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांचेही सहकार्य लाभले, यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात मराठी भाषा गौरव दिन हा कार्यक्रम पार पडला. शेवटी राज्यगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# शंकरराव चौकातील प्रस्तावित मोबाईल टॉवरला नागरिकांचा विरोध

**✹ आरोग्यधोका व नियमपालनाबाबत चौकशीची मागणी**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २७**

**कल्याण :** महानगरपालिका कार्यालयासमोरील शंकरराव चौक येथील वाहतूक बेटावर प्रस्तावित मोबाईल टॉवर उभारणीस नागरिकांनी तीव्र हरकती नोंदवल्या आहेत. वर्दळीच्या ठिकाणी टॉवर उभारल्यास आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो, अशी भूमिका मांडत सामाजिक कार्यकर्ते वल्ली राजन यांनी केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांना निवेदन दिले निवेदनात राज्य शासनाची परवानगी, दूरसंचार विभाग व भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण चे नियम, ईएमएफ किरणोत्सर्ग मानके, सार्वजनिक सुरक्षितता व रस्ता सुरक्षेचे निकष पूर्ण झाले आहेत का, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. परिसरात शाळा, निवासी वस्ती व ज्येष्ठ नागरिकांची संख्या अधिक असल्याने संभाव्य आरोग्यदुष्परिणामांची चिंता व्यक्त करण्यात आली असून, आवश्यक असल्यास परवानगी रद्द करून सुरक्षित पर्यायी ठिकाण निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# गाळेगाव आदिवासी पाड्यात कुत्रा चावल्याने सात वर्षाच्या मुलाचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण : आंबिवली जवळील गाळेगाव आदिवासी पाडा परिसरातील भटक्या मोकाट कुत्र्याने एका सात वर्षीय मुलाला चावा घेतल्याने मृत्यू झाल्याचा धक्कादायक प्रकार बुधवारी घडल्याचा समोर आल्याने केडीएमसी क्षेत्रातील भटक्या मोकाट कुत्र्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेची गंभीर दखल घेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नगरसेविका तेजश्री गायकवाड यांनी कल्याण डोंबिवली महापालिका मुख्यालयात धाव घेतली. नगरसेविका गायकवाड यांनी महापालिका आयुक्त आणि महापौरांची भेट घेतली.**

भटका कुत्रा चावल्यानंतर रेबीजची लक्षणे दिसू लागल्याच्या भितीपोटी कल्याण पूर्वेतील एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना ताजी असताना आत्ता पुन्हा कल्याण नजीक मोहने गाळेगाव आदिवासी पाडा परिसरात राहणाऱ्या खुशील शंकर वाघे सात वर्षाच्या मुलाला भटक्या कुत्र्याने चावा घेतल्याने मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

प्राप्त माहिती नुसार या मुलाचे आई वडील मोलमजूरी करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. खुशीलला भटका कुत्रा चावला होता. या भटक्या मोकाट कुत्र्याचा चाव्यात गालाचा लचका काढला गेल्याने त्याला रुग्णालयात उपचारासाठी नेले असता त्याच्यावर उपचार सुरु असताना मृत्यू झाला. खुशीलला जेव्हा कुत्रा चावला त्याचवेळी आणखीन एका मुलाला कुत्रा चावला होता. हा मुलगा जखमी झाला आहे. त्याच्यावर उपचार सुरु आहेत.

बल्याणी चौक, उंभार्णी, मोहिली, गाळेगाव, जेतवननगर, तिपन्नानगर, आर. एस. टेकडी, मोहने परिसरात भटक्या कुत्र्यांचा वापर वाढला आहे. भटक्या कुत्र्यांकडून रस्त्यावरुन जाणारे येणारे व्यक्तींवर धाव घेतली जाते. भटक्या कुत्र्यांकडून हल्ला केला जातो. या हल्ल्यात नागरीक जखमी होता. भटक्या कुत्र्यांची दहशत वाढली आहे. त्यामुळे नागरीकांमध्ये भितीचे वातावरण आहे. भटक्या कुत्र्यांकडून चावा घेतला जातो. भटक्या कुत्र्यांना पकडण्यासाठी विशेष पथक आणि गाडी फिरविण्यात यावी. भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यात यावे. भटक्या कुत्र्यांचे लसीकरण करण्यात यावे आदी मागण्या नगरसेविका गायकवाड यांनी महापालिका प्रशासनाकडे केल्या आहे.

याबाबत सामाजिक कार्यकर्ते हेमंत गायकवाड यांनी देखील प्रशासनाला सवाल करत भटक्या मोकाट कुत्र्याना प्रशासन आवार कसा घालणार, मोकाट भटक्या कुत्र्याचे रेबीज लसीकरण, निर्बीजकरण मोहीम व्यापक रित्या राबविणे अत्यंत गरजेचे आहे आणि मोकाट भटक्या कुत्र्याचे संख्या आटोक्यात आणाणे यासाठी प्रशासनाने खंबीरपणे धोरण अवंलबिले पाहिजे अशी मागणी केली. चिकन मटण विक्रेत्यांकडून कोंबड्यांच्या मांसाचा टाकाऊ कचरा योग्य विल्हेवाट न लावता उघड्यावर टाकला जात असल्याने हे खाद्य भटक्या आणि मोकाट कुत्र्यांना हिंस्र होण्यासाठी कारणीभूत ठरत असल्याचे गायकवाड यांनी सांगितले.

# महापालिकेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी केला सन्मान





दै. ठाणे जीवनदीप वार्ता
■ बातमीदार

**ठाणे (27) :** ठाणे शहराच्या विकासात आणि नागरिकांना दर्जेदार सेवा देण्यात सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान आहे. अनेक वर्षे कर्मचारी प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि कर्तव्यभावनेने अधिकारी कर्मचारी महापालिकेची सेवा करत असतात, सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य हे देखील आनंदाने व्यतीत करा असे नमूद करत महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

ठाणे महापालिकेच्या सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांचा सत्कार सोहळा आज ठाणे महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास उपमहापौर कृष्णा पाटील, अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त जी.जी गोदेपुरे आदी उपस्थित होते.

सेवानिवृत्ती हा शेवट नसून आयुष्यातील नव्या पर्वाची सुरुवात असल्याचे सांगत त्यांनी सर्वांना उत्तम आरोग्य, आनंदी आणि समृद्ध आयुष्याच्या शुभेच्छा महापौरांनी दिल्या. यावेळी सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देवून विविध विभागातील एकूण 36 अधिकारी कर्मचारी यांचा सन्मान करण्यात आला.

# भविष्यवेध



■ शनिवार
28 फेब्रुवारी 2026

**मेष**
एखाद्या सदस्याकडून तुम्हाला चांगली बातमी ऐकू येईल.वडिलांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. मोठ्यांचा सल्ला घ्या, तुम्हाला चांगला सल्ला मिळेल.

**वृषभ**
भावनेच्या भरात आज कोणालाही वचन देऊ नका. आज फालतू खर्चापासून दूर राहून बजेट सांभाळा. नवीन काम सुरू करण्यासाठी योग्य वेळेची वाट पहा.

**मिथुन**
आर्थिक परिस्थिती मजबूत होईल. जोडीदाराकडून प्रकल्पाच्या कामात पाठिंबा मिळेल, जो तुमच्या भविष्यातील यशासाठी उपयुक्त ठरेल.

**कर्क**
दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. सहकाऱ्यांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवले तर भविष्यात ते तुम्हाला महत्त्वपूर्ण फायदे देतील. खर्चावर नियंत्रण ठेवणे

**सिंह**
आज तुम्ही एखाद्या धार्मिक कार्यक्रमाला उपस्थित राहाल आणि यामुळे तुम्हाला मानसिक शांती मिळेल. दिवस तुमच्यासाठी मिश्रित असेल.

**कन्या**
कामावर तुम्ही चांगले काम कराल आणि तुमच्या सहकाऱ्यांकडून पूर्ण सहकार्य मिळेल. बांधकामाच्या कामात तुम्ही एखाद्या अनुभवीचा सल्ला घेऊ शकता.

**तुळ**
जर तुम्ही आज काहीतरी नवीन सुरू करण्याचा विचार करत असाल तर हा एक शुभ दिवस आहे. दिवस तुमच्यासाठी चांगला राहणार आहे.

**वृश्चिक**
उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतील आणि तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत होईल. ऑफिसमध्ये थोडे जास्त काम असेल, शारीरिक थकवा येऊ शकतो.

**धनु**
तुमच्यासाठी व्यस्त असेल. व्यवसायात नफा मिळविण्याची संधी असेल. दिवस चांगला जाणार. उत्तम रोजगाराच्या संधी आणि उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील

**मकर**
आर्थिक परिस्थिती मजबूत होईल. दिवस तुमच्यासाठी व्यस्त असेल. व्यवसायात नफा मिळविण्याची संधी असेल. आर्थिक परिस्थिती मजबूत होईल.

**कुंभ**
प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी तुम्ही तुमच्या जवळच्या व्यक्तीची मदत घेऊ शकता. कुटुंबातील सदस्यांसह धार्मिक सहलीची योजना आखू शकता.

**मिन**
तुम्ही मित्रांसोबत काही वेळ घालवाल आणि मित्राच्या वाढदिवसाच्या पार्टीचा आनंद घ्याल. दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे.



## राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कला क्रीडा महोत्सवाचा

# महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण सोहळा संपन्न

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (27) :** वैद्यकीय क्षेत्र म्हणजे केवळ अभ्यास, प्रयोगशाळा, रुग्णसेवा आणि जबाबदारी इतकंच नाही तर ते संवेदनशीलतेचं, सर्जनशीलतेचं आणि मानवतेचं क्षेत्र आहे. डॉक्टर होणे म्हणजे फक्त शरीरावर उपचार करणं नव्हे, तर मनालाही आधार देणं आहे आणि हे सामर्थ्य आपल्या कलागुणांमधूनच विकसित होत असते. वैद्यकीय शिक्षण हे निश्चितच कठीण आहे; पण त्याच वेळी स्वतःतील कलागुण जोपासणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे उद्गार महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी पारितोषिक वितरण सोहळ्याप्रसंगी केले.

डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे गुरूवारी ठाणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाच्या व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि विविध सहअभ्यासाक्रमांमध्ये उल्लेखनीय यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक सोहळा आयोजित करण्यात आला होता.





या कार्यक्रमास उपमहापौर कृष्णा पाटील, अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, जी.जी. गोदेपुरे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. स्वप्नाली कदम यांच्यासह रुग्णालयातील डॉक्टर्स, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमास ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. तर छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. स्वप्नाली कदम यांनी प्रास्ताविक केले. राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय आणि छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा, ठाणे येथे शैक्षणिक वर्षातील सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. यामध्ये शैक्षणिक, सांस्कृतिक उपक्रम घेण्यात आले. यात विशेष प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येणार असल्याचे डॉ. स्वप्नाली कदम यांनी नमूद केले. यावर्षीचे सर्व उपक्रम Odyssey या संकल्पनेखाली आयोजित केले असून, ही संकल्पना अध्ययन, सर्जनशीलता व उत्कृष्टतेच्या प्रवासाचे प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी महाविद्यालयाच्या 'लाईफ लाईन' या वार्षिक स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्वचारोग विभागातील निवासी डॉ आर.जी. तोरसेकर स्मृती पुरस्कार डॉ. नुपूर सांकलचा यांना, डॉ. एच.एस. भानुशाली स्मृती पुरस्कार MUHS अंतिम वर्षाच्या तानिया गोढा यांना, MUHS अंतिम वर्ष शस्त्रक्रिया प्रथम क्रमांक कु. रुही मैंदारकर यांना डॉ. एन शैलेश्वर पुरस्कार, प्रथम वर्ष MUHS शरीरक्रिया शास्त्र प्रथम क्रमांक सविता यादव यांना डॉ. सी. मैत्रा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसेच बॅच टॉपर्स, बॅच २०२० – तानिया गोढा, बॅच २०२१ – जिष्णू नायर, बॅच २०२२ – वृष्टी हरिया, बॅच २०२३ – संतुष्टी साळुंखे, संपूर्ण विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थी मुस्कान अरोरा, हसीबा अतीक, ओम पांडे, डोना जॉन्सन, रोशमी गावडे, राशी जाधव, हिमांशू तिवारी,'शब्दरंग' मराठी काव्यवाचन स्पर्धेतील प्रथम क्रमांक – भूषण जाधव, द्वितीय क्रमांक – हिमांशू तिवारी या विद्यार्थ्यांचा देखील यावेळी सन्मान करण्यात आला.

# होळी सण पर्यावरणाभिमुख पध्दतीने साजरा करा

## महापौर शर्मिला पिंपळोलकर व आयुक्त सौरभ राव यांचे आवाहन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे, (27) :** येत्या सोमवारी 02 मार्च 2026 रोजी होळी व 03 मार्च 2026 रोजी रंगपंचमी हा सण असून सर्वांनी पर्यावरणभिमुख पद्धतीने साजरा करावा असे आवाहन महापौर शर्मिला पिंपळोलकर व महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी नागरिकांना केले आहे. होळी हा आनंद, उत्साह आणि एकोप्याचा सण असला तरी तो साजरा करताना पर्यावरणाचे भान राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे महापौरांनी नमूद केले. होळीसाठी झाडे तोडू नयेत. तसेच रासायनिक रंगांऐवजी नैसर्गिक रंगांचा वापर करावा, रासायनिक रंगांमुळे त्वचा, डोळे तसेच पर्यावरणाला हानी पोहोचू शकते. प्राण्यांवर रंग टाकणे किंवा त्यांना त्रास देणे टाळावे, होळीच्या उत्सवात पाण्याचा अपव्यय न करता कोरडी होळी साजरी करण्यास प्राधान्य द्यावे असे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे. "पर्यावरणपूरक होळी साजरी करून पर्यावरण रक्षणाची जबाबदारी पार पाडूया," असे नमूद करीत महापौर शर्मिला पिंपळोलकर व आयुक्त सौरभ राव यांनी ठाणेकरांना होळी सणाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.





# दिव्यांग मुलांचे भविष्य उज्ज्वल होण्यासाठी त्यांचे पालकांनी त्यांना सर्व स्पर्धांसाठी संधी दयावी ! - महापौर हर्षाली चौधरी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**■ बातमीदार**

दिव्यांग मुलांचे भविष्य उज्ज्वल होण्यासाठी त्यांचे पालकांनी त्यांना सर्व स्पर्धांसाठी संधी दयावी असे प्रतिपादन महापालिका महापौर हर्षाली चौधरी यांनी आज केले. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभागामार्फत स्व.नाना फडके मैदान कल्याण (पश्चिम) येथे समाज कल्याण विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या दिव्यांग व्यक्तींच्या क्रिडा स्पर्धाच्या उद्घाटन समयी बोलतांना त्यांनी हे प्रतिपादन केले. स्पर्धेत सहभागी खेळाडुंचे कौतुक करतांना माझ्यासाठी कोणी दिव्यांग नाही तर सर्वजण सर्वसामान्य आणि सक्षम नागरिक आहेत असे सांगत त्यांनी दिव्यांग बांधवांचा गौरव केला.

या समयी महापालिका आयुक्त अभिनव गोयल, महापालिका सचिव किशोर शेळके, समाज कल्याण विभागाच्या उपायुक्त कांचन गायकवाड तसेच पालिका सदस्य, सदस्या व इतर मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. दिव्यांगाना सक्षम बनविण्याचा आपला प्रयत्न असून क्रिडा स्पर्धा ही देखील एक थेरेपी आहे, यासाठी पालकांनी मुलांना विविध ॲक्टीव्हिटीमध्ये घालावे. महापालिका अशा उपक्रमांमधून दिव्यांग व्यक्तींना नक्कीच प्रोत्साहन देत राहील असे उद्गार महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आपले मनोगतात काढले.

स्व.नाना फडके मैदानात आज दिव्यांग बांधवांसाठी कॅरम, गोळाफेक, बुध्दीबळ, व्हिलचेअर रेसिंग, नेमबाजी, 100 मी. धावणे (कर्णबधिर आणि मुकबधिर व्यक्तींसाठी), बादलीत चेंडू टाकणे (गतीमंद व्यक्तीसांठी), इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये दिव्यांग बांधवांनी मोठया प्रमाणत सहभाग नोंदवून आपल्या कौशल्य व जिद्दीचे दर्शन घडविले.

या स्पर्धांच्या आयोजनामुळे दिव्यांग बांधवामध्ये आत्मविश्वास वाढून समाजामध्ये सकारात्मक संदेश गेला आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समाज विकास अधिकारी प्रशांत गवाणकर व इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त

# सेंट्रल रेल्वे मजदूर संघ्यावतीने भव्य रांगोळीसह 'मी मराठी-माझी स्वाक्षरी मराठी' उपक्रम

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २७**

**कल्याण : २७ फेब्रुवारी जागतिक मराठी राजभाषा दिनानिमित्त सेंट्रल रेल्वे मजदूर संघ, कल्याण यांच्यावतीने कसारा एंड ब्रिज, कल्याण पश्चिम येथे भव्य रांगोळी काढून मराठी भाषेचा गौरव करण्यात आला. यावेळी "मी मराठी... माझी स्वाक्षरी मराठी" या उपक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते.**



सी.आर.एम.एस. अध्यक्ष व एन.एफ.आय.आर.चे संयुक्त महामंत्री डॉ. प्रवीण वाजपेयी यांच्या आदेशानुसार हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमास मुंबई विभागाचे अध्यक्ष श्री. विवेकभाई शिशौदिया, श्री. वेंकट रमणजी, श्री. राजेंद्रजी गुजरे, श्री. सचिनजी आवारे, श्री. संजीव चौहान, श्री. आनंद वाघेला, सौ. शीना मॅडम, श्री. राजेश कांबळे, श्री. चेतन थळे, श्री. मालू पानसरे, श्री. राजेश पाटील, श्रीमती रोहिणी गायकवाड, श्री. सुनील सांबरे, श्री. एल. डी. सावंत, श्री. मनोज चौधरी, श्री. विजय प्रजापती, श्री. विलास शिरसाट, श्री. राजू परदेशी, श्री. राधेश्यामजी आदी उपस्थित होते.

**■ पेढे वाटपातून आनंदोत्सव**

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पेढे वाटप करण्यात आले. मराठी भाषेप्रती अभिमान व्यक्त करत मराठी राजभाषा दिन मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.

# भिवंडी मनपा क्षेत्रात अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, फ्लेक्स व होर्डिंग्ज लावणाऱ्यांवर कठोर कारवाई : आयुक्त अनमोल सागर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**■ प्रतिनिधी**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सार्वजनिक रस्ते, पदपथ, उड्डाणपूल, चौक, शासकीय/ महानगरपालिका मालमत्ता तसेच खासगी मालमत्तांवर मालकाची परवानगी न घेता मोठ्या प्रमाणावर अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, फ्लेक्स व होर्डिंग्ज लावण्यात येत असल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे. सदर कृत्य हे कायद्यानुसार दंडनीय व बेकायदेशीर आहे.**



सदर प्रकारामुळे शहराचे सौंदर्य विद्रूप होत असून सार्वजनिक सुव्यवस्था, वाहतूक सुरक्षा व नागरिकांच्या सुरक्षिततेस बाधा निर्माण होत आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून याकामी कार्यवाहीचे कठोर आदेश मा. आयुक्त श्री. अनमोल सागर, भा.प्र. से. यांनी प्रभाग समिती क्रमांक १ ते ५ चे सर्व सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांना निर्गमित केले होते.

त्यानुसार प्रभाग समिती क्रमांक १ ते ५ चे सर्व सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांचे मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, फ्लेक्स व होर्डिंग्ज हटविण्याची विशेष मोहीम राबविण्यात आली. यामध्ये एकुण ४२ अनधिकृत पोस्टर, १३८ अनधिकृत बॅनर्स हटविण्यात आले असून एका विरोधात गून्हा दाखल केला आहे.

मा. आयुक्त यांच्या मार्फत सदरची विशेष तपासणी मोहीम दर आठवडयाला राबविण्यात येणार असल्याचे सुचित केले असून संबंधित अनधिकृत फलक/बॅनर्सवर नमूद असलेली नावे, संस्था, राजकीय पक्ष, आयोजक, छपाई करणारे व प्रायोजक यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरण अधिनियम, १९९५ अंतर्गत थेट गुन्हा दाखल करावा व हटविण्यात आलेल्या साहित्याचा पंचनामा करून त्याचा संपूर्ण खर्च संबंधित व्यक्ती/संस्था यांच्याकडून वसूल करण्यात यावा असे स्पष्ट निर्देश मा. आयुक्त यांनी प्रभाग अधिकारी यांना दिले आहेत.



# काळूराम धनगर यांची तिस-यांदा ठाणे ग्रामीण अनुसूचित जाती मोर्चाच्या अध्यक्षपदी निवड!

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**शहापूर ग्रामीण ● नरेंद्र पाटील**

ठाणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व भारतीय जनता पार्टीचे निष्ठावंत कार्यकर्ते वासिंद व परिसरातील सर्वांच्या सुख दुःखात सहभागी असणारे अभ्यासू नेतृत्व काळूराम नारायण धनगर यांची तिस-यादा भारतीय जनता पार्टीच्या ठाणे ग्रामीणच्या अनुसूचित जाती मोर्चाच्या अध्यक्ष पदी निवड झाली आहे. त्यांनी यापूर्वी शहापूर तालुका सरचिटणीस,कल्याण जिल्हा कार्यकारणी सदस्य म्हणून काम केले आहे तसेच शहापूर तालुका दक्षता समिती सदस्य म्हणून काम केले आहे आता भारतीय जनता पक्षाचे राज्यअध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी खासदार कपिल पाटील व मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपाचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाकी यांनी धनगर यांना नेमणूक पत्र देऊन त्यांची निवड केलीआहे.त्यांच्या या निवडीमुळे त्यांचे सर्व थरांतून अभिनंदन होत आहे.

# "हिंद-दी-चादर" समागम शताब्दी वर्षानिमित्त उल्हासनगर महापालिकेत आढावा बैठक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २७**

**उल्हासनगर :** "हिंद-दी-चादर" श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त खारघर येथे होणाऱ्या भव्य समागमाच्या पार्श्वभूमीवर उल्हासनगर महानगरपालिका येथे दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता आढावा बैठक पार पडली. या बैठकीत उल्हासनगर शहरातून ०४ रुग्णवाहिका व वैद्यकीय पथक, तसेच सुमारे ५० बसेसद्वारे भाविकांच्या वाहतुकीचे नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. समागमासाठी जाणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याचे पाणी, नाश्ता व वाहतूक व्यवस्थापनाबाबत चर्चा करून आवश्यक सूचना देण्यात आल्या. समागमस्थळी १० हजार लिटर क्षमतेचे १० टँकर तसेच आरोग्य व वैद्यकीय पथकांची व्यवस्था महापालिकेकडून करण्यात आली आहे. बैठकीस महापौर, अतिरिक्त आयुक्त, प्रशासकीय अधिकारी, पोलीस अधिकारी, विभागप्रमुख, समन्वय समितीचे सदस्य तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. समागम कार्यक्रम सुरक्षित, सुरळीत व शिस्तबद्ध पार पडावा यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करण्याचे निर्देश देण्यात आले.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

| | |
|---|---|
| f | https://www.facebook.com/jeevandeepnews/ |
| Instagram | https://www.instagram.com/thane_jeevandeep/ |
| X | https://x.com/Jeevandeepvarta |
| www | https://jeevandeepvarta.com/ |

# जीवनदीप महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिनाचा जागर






**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**गोवेली (दि. २७ )**

जीवनदीप महाविद्यालय, गोवेली येथे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त 'मराठी भाषा गौरव दिन' उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, प्रा. सतीश लकडे यांच्यासह प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. वाघ यांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून झाली. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. सतीश लकडे यांनी मराठी भाषेचे सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक महत्त्व अधोरेखित केले. "मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून आपली ओळख आणि अस्मिता आहे. तिचे जतन व संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे," असे त्यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. अशोक वाघ यांनी विद्यार्थ्यांना मातृभाषेचा अभिमान बाळगण्याचे आवाहन केले, तर उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे यांनी मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेचा आढावा घेत विद्यार्थ्यांना भाषिक कौशल्य वृद्धिंगत करण्याचा सल्ला दिला. या कार्यक्रमासाठी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे व संचालक प्रशांत घोडविंदे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडला.





# कल्याण मुरबाड रोडवर उभारलेल्या पोलमुळे अपघाताची शक्यता

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण मुरबाड राष्ट्रीय महामार्गावर रस्त्याच्या अगदी कडेला वरप तलावा जवळ रस्त्यात लाईट पोल उभारण्यात आले आहेत. या पोलमुळे वाहनांना धडकण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. विशेषतः रात्री व हाय-स्पीड वाहतुकीदरम्यान अपघाताची शक्यता वाढते. आयआरसी सुरक्षा मानकांनुसार आवश्यक सेफ्टी अंतर व संरक्षण व्यवस्था दिसून येत नाही. याबाबत सामाजिक कार्यकर्ते निकेश पावशे यांनी तहसीलदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पत्रव्यवहार करत याकडे लक्ष वेधले आहे. कांबा, वरप, म्हारळ ग्रामपंचायत या तिन्ही ठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूस धूळ आणि कचरा असून फुटपाथ नाहीत. लोकांना अशा समस्या असताना एमएसईबीचे अतिक्रमण चालू आहे. दोन दिवसांपूर्वी येथे मोठा अपघात झाला असताना सुद्धा प्रशासन जागे झाले नसून आणखी खत पाणी घालत आहे. त्यामुळे या पोल उभारणीची परवानगी व तांत्रिक मंजुरी तपासावी, सेफ्टी ऑडिट करून सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक सुधारणा कराव्यात. यामध्ये नियमभंग असल्यास तात्काळ कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते निकेश पावशे यांनी केली आहे.



# मजदूर संघटनेच्या माध्यमातून नाका कामगारांना 'सुरक्षा संच' वाटप



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
■ **शरद शहाणे**

**डोंबिवली** - महाराष्ट्र जनरल मजदूर संघटनेच्या माध्यमातून डोंबिवली पूर्वेकडील दत्तनगर येथील लेवा भवन सभागृहात नाका कामगारांना शासन योजनेंतर्गत गृहोपयोगी वस्तू, भांडी व अत्यावश्यक संच, सुरक्षा संच (सेफ्टी कीट) ज्या कामगार कार्यालयात ऑनलाईन नोंदणी झालेल्या आहेत, त्या कामगारांना देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र जनरल मजदूर संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मण मिसाळ, परिवहन समितीचे माजी सभापती संजय पावशे, प्रसिद्ध कलाकार अक्षदा दास, समाजसेवक समीर जगे, शिवसेना पदाधिकारी प्रकाश म्हात्रे, रिपाइंचे माणिक उघडे, मीना साळवे, समाधान तायडे, दिलखुश माळी, शिवसेना पदाधिकारी सुदाम जाधव, रेश्मा चिकटे, संघटनेचे सहखजिनदार रामचंद्र वाघ, संघटनेचे केंद्रीय कमिटी सदस्य रामेश्वर शेजूळ आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात अध्यक्ष लक्ष्मण मिसाळ म्हणाले, इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ सहायक कामगार आयुक्त कार्यालयाच्या वतीने नोंदणीकृत नाका कामगारांना गृहउपयोगी वस्तू, भांडी व अत्यावश्यक संच देण्यात येते. परिवहन समितीचे माजी सभापती संजय पावशे म्हणाले की, महाराष्ट्र जनरल मजदूर संघटना नेहमीच नाका कामगारांसाठी शासनाकडे पाठपुरावा करत असते. संघटनेच्या प्रयत्नात यश येत असून आजवर अनेक नाका कामगारांना याचा लाभ मिळाला आहे.

# तीर्थरूप डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान राबवणार महास्वच्छता अभियान

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाशिंद ता. २८ :** तीर्थरुप डॉगनानासाहेब धमधिकारी प्रतिछठनच्या वतीने शहापूर तालुक्यातील वाशिंद बैठक परिसरात येत्या १ मार्च रोजी व्यापक स्वरूपाचे "महास्वच्छता अंभियान" राबविण्यात येणार असून या उपक्रमात तीर्थरूप डॉश्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे हजारो श्रीसदस्यउत्स्फूर्तपणे सहभागी हौणार आहेत. तालुक्यातील गावोगावी स्वच्छता, जनजागृती आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेशं पोहोचविण्याचा या अभियाना मागील मुख्य उद्देश आहे, या महास्वच्छता अभियानांतर्गत प्रमुख सार्वजनिक ठिकाणे, रस्ते,शाळा परिसर, देवस्थान परिसर तसेचनदी-नाले व ग्रामपंचायत हद्दीतील स्वच्छतेकडे विशेष त लकष दिले जाणार आह.स्वयंसेवकंकडून कचरा संकलन, प्लास्टिकमुक्ती जनजागृती आणि नागरिकांना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यासाठी विशेष मोहिम रीबविण्यात येणार आहे. प्रति्ठानच्यावतीने दिलेल्या माहितीनुसार, 'स्वच्छ गाव, निरोगी समाज" या ध्येयाने प्रेरित होऊन हा उपक्रम राबविण्यात येत आहे, तालुक्यातील युवक,महिला बचतगट, सामाजिक संस्था आणि ग्रामस्थानी मोळ्या संख्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे, या महास्वच्छता अभियानामुळे तालुक्यात स्वच्छतेबाबत जागरुकता वाटून नागरिकांमध्ये पर्यावरणपूरक जीवनशेलीचा संदेश दृढ होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे, 1 मार्चरोजी सकाळी 7 वाजता ठराविक ठिकाणी एकत्र येऊन अमियानाला प्रांभ करण्यात येणार असू वाशिंद बैडकी बरोबरच संपर्ण तालुकाभर स्वच्छत अभियान राबवला जाणार आहे.

# अखिल भारतीय शिक्षक संघटनेच्या उपाध्यक्षपदी प्रा.भिमराज शिकारे यांची निवड

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**पेण (प्रतिनिधी)**



पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात गेल्या ३३ वर्षांपासून कार्यरत असलेले भौतिकशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक भिमराज शिकारे यांची नुकतीच अखिल भारतीय शिक्षक संघटनेच्या (AIFUCTO) उपाध्यक्ष पदी निवड झाली आहे. ही देशपातळीवरील सर्व प्राध्यापक संघटनांची 'सर्वोच्च संघटना' असून ती भारतातील सर्व प्राध्यापकांचे देशपातळीवर प्रतिनिधित्व करते.

गेली२५वर्षे प्रा.शिकारे हे प्राध्यापकांच्या ( बॉम्बे युनिव्हर्सिटी अँड कॉलेज टीचर्स युनियन (बुक्टू) मुंबई या संघटने मध्ये काम करत असून यापूर्वी मुंबई विद्यापीठाचे अधिसभा सदस्य म्हणून देखील निवडून आले होते. सध्या ते महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारिणी सदस्य पदी असून बुक्टूचे उपाध्यक्ष पदही भूषवित आहेत. त्यांच्या या कर्तृत्वाने आजपर्यंत शिक्षकांच्या अनेक मागण्यांच्या संदर्भात त्यांनी केलेले कार्य हे अधोरेखित होत आहे. पेण येथील भाऊसाहेब नेने महाविद्यालयात काम करणाऱ्या प्राध्यापकाला देशपातळीवरील संघटनेमध्ये इतक्या मोठ्या पदावर काम करण्याची संधी मिळाल्यामुळे पेण शहराचा तसेच महाविद्यालयाचा गौरव वाढीस लागला आहे. प्रा. शिकारे यांचा महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांच्या वतीने प्रा.गोरे, प्रा आझमी व प्रभारी प्राचार्या डॉ. सावंत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रा. शिकारे यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# महासभेचे थेट प्रक्षेपण करा - मनसेची मागणी

## मनसेचे विभाग अध्यक्ष कपिल पवारांचे आयुक्तांना पत्र

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** महानगरपालिकेत दर महिन्याला होणाऱ्या महासभेचे थेट प्रक्षेपण करण्याची मागणी मनसेने केली असून याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनाचे विभाग अध्यक्ष कपिल पवार यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्तांना पत्र दिले आहे. महानगरपालिकेत दर महिन्याला होणाऱ्या महासभा व इतर सभांचे थेट प्रक्षेपण करण्यात यावे, जेणेकरून नागरिकांनी निवडून दिलेले नगरसेवक महापालिकेत नेमके कशा पद्धतीने काम करतात हे जनतेला समजू शकेल, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच नगरसेवक व अधिकाऱ्यांचा कारभार पारदर्शक राहावा आणि लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा थेट सहभाग वाढावा, या दृष्टीने ऑनलाइन थेट प्रक्षेपण उपयुक्त ठरेल, असेही पत्रात नमूद करण्यात आले आहे. महासभा व विविध समित्यांतील चर्चांमधून घेतले जाणारे निर्णय नागरिकांपर्यंत पोहोचल्यास प्रशासनावर जनतेचा विश्वास अधिक दृढ होईल. त्यामुळे महापालिकेने तातडीने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून महासभा व महत्त्वाच्या सभांचे थेट प्रक्षेपण सुरू करावे, अशी जोरदार मागणी मनसेकडून करण्यात आली आहे.



# खर्डी महाविद्यालयात 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी येथील मराठी विभागाच्या वतीने दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९.३० वा. कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त 'मराठी भाषा गौरव दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.**

या कार्यक्रमासाठी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष श्री. रविंद्र घोडविंदे सर यांची मोलाची प्रेरणा लाभली. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने झाली. कवी सतीश केतकर यांनी सादर केलेल्या सरस्वती वंदनेने वातावरण मंगलमय झाले.

कार्यक्रमाची प्रस्तावना मराठी विभाग प्रमुख प्राचार्य डॉ. कैलास कळकटे यांनी करत, " मराठी भाषेचा समृद्ध साहित्यवारसा आणि आजच्या काळातील तिचे महत्त्व यावर प्रकाश टाकला." यानंतर काव्यवाचन सत्रात सौ. दया घोंगे, श्री. रवींद्र कारेकर, श्री. कैलास बडगुजर, श्री. सतीश केतकर व श्री. शाम शेलार यांनी आपल्या प्रभावी कवितांद्वारे सामाजिक जाण, मानवी मूल्ये आणि भावविश्व सादर केले. मनोगत सत्रात सिमरन श्याम शेलार हिने 'माझे बाबा' या विषयावर स्वरचित कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

वाङ्मय मंडळाच्या वतीने मान्यवर कवींच्या हस्ते "सृजन" या भित्तीपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले. या भित्तीपत्रक निर्मितीत कु. सिमरन शेलार, रश्मी हिले,नेहा पाडेकर व मानसी शेलवले यांचा सहभाग उल्लेखनीय ठरला. त्यानंतर कैलास बडगुजर यांनी "वाचाल तर वाचाल" या विषयावर प्रभावी विचार मांडले, तर दया घोंगे यांनी मराठी भाषा दिनानिमित्त प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दिप्ती मोरे यांनी केले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सेंच्युरी रेयॉनच्या विद्यार्थ्यांनी अनुभवलं आकाश दर्शन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
■ **कुणाल म्हात्रे**

**कल्याण :** सेंच्युरी रेयॉन हायस्कूल शहाड, द सायन्स पॉइंट ॲक्टिव्हिटी अड्डा टिटवाळा, यंग सायंटिस्ट डेन बदलापूरतर्फे शहाड येथील सेंच्युरी रेयॉन हायस्कूलच्या प्रांगणात आकाशनिरीक्षण संपन्न झाले. सोशल मीडियामधून मिळणाऱ्या अपुऱ्या आणि फसव्या ज्ञानातून बाहेर पडून प्रत्यक्ष ग्रहगोल, तारे, नक्षत्र आणि राशी पाहताना विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना विलोभनीय अनुभव आले.

पृथ्वीचे स्थान, सूर्यमाला, आकाशगंगा आणि संपूर्ण विश्व यांची माहिती प्रोजेक्टरमधून पाहताना सर्वजन आश्चर्यचकित होत होते. विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी अनेक शंका आणि प्रश्न यावेळी विचारले. या सर्व विचारलेल्या प्रश्नांची किशोर पाटील यांनी सोप्या आणि सहज समजेल अशा शब्दांत उत्तरे दिली. विश्वाचा अनोखा नजारा दाखवताना प्रथम विद्यार्थ्यांना आकाश ग्रहगोलांची प्राथमिक माहिती देण्यात आली. विश्वाचा अफाट पसारा, यात मानवाचे स्थान, ग्रह आणि उपग्रहांचे भ्रमण यांबाबतही माहिती दिल्यानंतर टेलिस्कोपमधून गुरु आणि गुरूचे उपग्रह, चंद्राची कोर आणि लेसरच्या मदतीने तारकापुंज असा विश्वाचा अनोखा नजारा विद्यार्थ्यांनी पाहिला. हे सर्व पाहून अनेक विद्यार्थी आवाक होत होते.

टेलिस्कोपमधून आकाशाचे निरीक्षण करायला सिता साहू, दुधावडे, राकेश पांडे, मनिषा अहिरे यांसह यंग सायंटिस्ट टिटवाळाचे किशोर पाटील, आरुष पाटील आणि इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविण्यासाठी अशा प्रकारचे आकाशनिरीक्षणाचे आणि वैज्ञानिक जाणिवा जागृतीचे उपक्रम प्रत्येक शाळेने घेणे गरजेचे आहे असे विद्याराणी गायकवाड यांनी यावेळी सांगितले.

# मराठी भाषा गौरव दिना निमित्त कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या सर्व शाळांमध्ये विविध कार्यक्रम

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २७**







**बदलापूर :** महाराष्ट्रात दरवर्षी २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. कवीवर्य वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंतीचे औचित्य साधून यंदा हा दिवस विशेष उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषा गौरव दिनाचा आनंद द्विगुणित झाला आहे. दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी कुळगाव बदलापूर नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आयएसओ मानांकन प्राप्त कुबनप पर्यावरण पूरक शाळा क्रमांक १५ मध्ये कवीश्रेष्ठ विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी राजभाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने शाळेतील विद्यार्थ्यांनी नृत्य, भाषण, गायन आदी विविध कार्यक्रम सादर करत मराठी भाषेप्रती आपली भावना व्यक्त केली. सदर कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग मिळाला. मराठी भाषेचे महत्त्व, तिचे वैभव आणि अभिजाततेचा गौरव या उपक्रमांमधून ठळकपणे अधोरेखित झाला.



# ठामपा शाळा क्र. 7 मध्ये मराठी भाषा दिन उत्साहात साजरा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (27) :** ज्येष्ठ कवी, साहित्यिक व ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून टेंभी नाका शाळा क्र. 7, इंग्रजी माध्यम (बालवाडी विभाग) यांच्या वतीने आज दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात संत साहित्याच्या स्मरणाने करण्यात आली. पालखीत संत ज्ञानेश्वर यांची आकर्षक व सुशोभित प्रतिमा ठेवण्यात आली होती. फुलांची सजावट, पारंपरिक रांगोळी आणि ढोल-ताशांच्या गजरात दिंडीला प्रारंभ झाला. बालवाडीतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून मराठी संस्कृतीची झलक सादर केली. मुलांनी "मराठी असे आमची मायबोली", "जय जय महाराष्ट्र माझा" अशा घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला. काही विद्यार्थ्यांनी मराठी कवितांचे सादरीकरण केले, तर काहींनी मराठी भाषेचे महत्त्व सांगणारी भाषणेही केली.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषेचा इतिहास, तिची समृद्ध परंपरा आणि साहित्यिक वारसा याविषयी माहिती दिली. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्येही मातृभाषेबद्दल प्रेम, जिव्हाळा आणि अभिमान निर्माण व्हावा हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

# उल्हासनगर महापालिकेतर्फे पर्यावरणपूरक होळी व धुळीवंदन साजरे करण्याचे आवाहन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



संपुर्ण देशभरात होळी व धुळीवंदन हे सण दिनांक २ व ३ मार्च, २०२६ रोजी मोठया उत्साहाने साजरा केला जात असतो. महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपल्या शहराचे पर्यावरण प्रदुषणमुक्त, स्वच्छ व हरीत असावे याकरीता पर्यावरणपुरक सण उत्सव साजरे करणेकरीता नागरीकांमध्ये जनजागृती करावी असे निर्देश आहेत. त्याअनुषंगाने मा. आयुक्त श्रीम. मनिषा आव्हाळे, तसेच मा. अतिरिक्त आयुक्त, डॉ. किशोर गवस यांचे मार्गदर्शनाखाली पर्यावरण विभागातर्फे पर्यावरणपुरक होळी व धुळीवंदन प्रतिकात्मक स्वरुपात महापालिका मुख्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर मा. महापौर, श्रीम. अश्विनी कमलेश निकम व मा. उपमहापौर, श्री. अमर लुंड यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला. तसेच सर्वांच्या उपस्थितीत हरीत शपथ् घेण्यातआली.

पृथ्वीवरील सर्व जीवन भुमी, जल, अग्नि, वायु व आकाश या पाच नैसर्गिक घटकांवर अवलंबून आहे. परंतु सण, उत्सव उत्साहात साजरे करताना नकळत आपल्याकडून निसर्गाची हानी होते. त्यामुळे उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व नागरीकांना आजच्या या कार्यक्रमाद्वारे आवाहन करण्यात आले की, आपले सण, उत्सव आपण मोठया उत्साहात साजरे करताना पर्यावरणाची/ निसर्गाची हानी होणार नाही याची काळजी घेऊन साजरे करावेत. पाण्याचा अपव्यय टाळावा, रासायनिक रंगांचा वापर न करता, पर्यावरणपुरक रंगांचा वापर करावा. होळी उभी करण्यासाठी मोठया प्रमाणात वृक्षतोड करू नये, पर्यावरणपुरक साहित्य वापरून लहान स्वरुपात होळी उभी करावी.

पर्यावरण विभागातर्फे आयोजित सदर कार्यक्रमाचे नियोजन उपायुक्त श्रीम. विशाखा मोटघरे, विभागपमुख श्रीम. विशाखा सावंत व पर्यावरण विभागाचे कर्मचारी यांनी केले होते. सदर कार्यक्रमास डॉ. दिपाली चौगले, उपायुक्त (मुख्यालय), श्री. अंकुश कदम, भांडार विभागप्रमुख, श्री. राजा बुलानी, विधी विभागप्रमुख, श्रीम. छाया डांगळे, मालमत्ता व्यवस्थापक, वृक्ष फाऊंडेशनच्या श्रीम. ज्योती तायडे व सर्व महापालिका कर्मचारी उपस्थित होते.

# पीएनटी कॉलनीतील नागरिकांचा पाणी टंचाई विरोधात आक्रोश

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील डोंबिवली पूर्वेतील नांदिवली पाडा आणि पी अँड टी कॉलनी परिसरात मागील तब्बल २५ दिवसांपासून पाणीपुरवठा पूर्णपणे बंद असल्याच्या निषेधार्थ शेकडो महिला-पुरुष नागरिकांनी आज सकाळी कल्याण डोंबिवली महानगरपालिका मुख्यालयावर मोर्चा काढत जोरदार घोषणाबाजी केली. नांदिवली पाडा, पी अँड टी कॉलनीसह साई दर्शन नक्स १, साई दर्शन नक्स, साई दर्शन, बालाजी, गुरु दर्शन, लक्ष्मण निवास आदी सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये पाणीपुरवठा पूर्णतः ठप्प आहे. यापूर्वी काही दिवस अत्यल्प दाबाने पाणी येत होते; मात्र गेल्या २५ दिवसांपासून परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. या पाणीटंचाईमुळे महिला, वृद्ध, लहान मुले यांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत असून दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. पाणी हा मूलभूत हक्क असून नियमित पुरवठा मिळणे अत्यावश्यक असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

महापालिकेकडून ५०० रुपये आकारून टँकरने पाणीपुरवठा केला जात असल्याचा आरोप मोर्चेकऱ्यांनी केला. मात्र हे पाणी अस्वच्छ व आरोग्यास अपायकारक असल्याने अनेक नागरिक व लहान मुले आजारी पडल्याचेही त्यांनी सांगितले. निवडणुकीच्या काळात दीड महिना परिसरात फुल प्रेशरने पाणी मिळत होते. मात्र निवडणूक संपताच पाणीपुरवठा कमी झाला आणि अखेर बंदच झाला. "हा केवळ निवडणुकीचा जुमला होता का?" असा गंभीर सवाल नागरिकांनी उपस्थित केला.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024